## सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला

आयोजित

# कै. गुरूवर्य बापूसाहेब झपके ४३ वा स्मृती समारोह

गुणवंत शिक्षक पुरस्कार व
वक्तृत्व स्पर्धा- सन-२०२४




प्रति,

____________________

____________________

____________________

* प्रेषक *

**श्री. अ. ल. गायकवाड**

प्राचार्य

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनि. कॉलेज, सांगोला

## सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला

आयोजित

# कै. गुरूवर्य बापूसाहेब झपके ४३ वा स्मृती समारोह

## वक्तृत्व स्पर्धा सन-२०२४



प्रति,
मा. प्राचार्य/मुख्याध्यापक

यांना स.न.वि.वि.

महोदय,

परमपूज्य कै. गुरूवर्य बापूसाहेब झपके म्हणजे सांगोल्यासारख्या उजाड माळरानावर विद्यार्थीरूपी चकोरांची ज्ञानतृष्णा भागविणारा एक सुधांशू, अखंड परिश्रम, दुर्दम्य आशावाद, कमालीचा साधेपणा व मनाचा सच्चेपणा यांचे मुर्तिमंत प्रतिक !

राष्ट्रपिता महात्मा गांधी व गांधीवाद यावर प्रचंड निष्ठा असणारे, देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून ब्रिटीशांचा कारावास भोगणारे, समाजऋणाची सर्वथैव जाणीव असणारे व विद्यार्थ्यांच्या मनावर व व्यक्तिमत्वावर रचनात्मक संस्कार करण्यातच आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता मानणारे बापूसाहेब म्हणजे आमच्या मनाच्या गाभाऱ्यातील शिवमंगल मूर्ती ! आपल्या कर्तृत्वाने मातीलाही गंधित करणारी ही माणसंच समाजाला पुढं नेत असतात.

या ज्ञानियाच्या तेजाला, ज्ञान प्रकाशाच्या पूजकाला व सरस्वतीच्या पुत्राला त्रिवार अभिवादन !

परमपूज्य कै. बापूसाहेब झपके यांच्या ४३ व्या स्मृतीसमारोहानिमित्त आम्ही तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करीत आहोत. या स्पर्धेसाठी आपल्या प्रशाला व ज्युनि.कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी सहभागी होण्यासाठी व त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आपल्या उदंड प्रतिसादाची अपेक्षा.

## स्पर्धेची माहिती

| | | | |
|---|---|---|---|
| गट १ ला<br>वक्तृत्व स्पर्धा<br>(जिल्हास्तरीय) | इ. ११ वी व १२ वी (विषय)<br>१. जीवनाचे दिशादर्शक-कै.गुरूवर्य बापूसाहेब झपके<br>२. सोशल मीडिया चिंता व चिंतन<br>३. पेपर फुटीच्या विळख्यात अडकला तरूण<br>४. मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा | सोमवार<br>दि.०९.०९.२०२४<br>सकाळी ११.००<br>वा. | कालावधी<br>७+१<br>मिनिटे |
| गट २ रा<br>वक्तृत्व स्पर्धा<br>(जिल्हास्तरीय) | इ. ८ वी ते १० वी (विषय)<br>१. शिक्षणातील दीपस्तंभ -<br>कै. गुरूवर्य बापूसाहेब झपके<br>२. थांबा, निसर्गचक्र बदलत आहे.<br>३. ऑनलाईनच्या काळात माणूसकीचे काय ?<br>४. शेतकरी सुखी होणार का ? | सोमवार<br>दि. ०९.०९.२०२४<br>सकाळी ११.००<br>वा. | कालावधी<br>६+१<br>मिनिटे |
| गट ३ रा<br>वक्तृत्व स्पर्धा<br>(तालुकास्तरीय) | इ. ५ वी ते ७ वी (विषय)<br>१. आदर्श व्यक्तिमत्व -<br>कै. गुरूवर्य बापूसाहेब झपके<br>२. माझी माय भू संताची<br>३. नाते निसर्गाशी<br>४. शाळा संस्काराचे मंदिर | मंगळवार<br>दि.१०.०९.२०२४<br>सकाळी ११.००<br>वा. | कालावधी<br>५+१<br>मिनिटे |

## प्रत्येक गटातील स्पर्धकासाठी पारितोषिके

| नं. | पारितोषिके | जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा | | तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा |
|---|---|---|---|---|
| | | गट ११ वी, १२ वी | गट ८ वी ते १० वी | गट ५ वी ते ७ वी |
| १. | प्रथम | ३,०००/- | २,५००/- | २,०००/- |
| २. | व्दितीय | २,०००/- | २,०००/- | १,५००/- |
| ३. | तृतीय | १,५००/- | १,५००/- | १,०००/- |
| ४. | चौथे | १,०००/- | १,०००/- | ७००/- |
| ५. | पाचवे-<br>* जिल्हास्तरीय स्पर्धा सांगोला तालुक्यातील स्पर्धकासाठी)<br>* तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा (ग्रामीण स्पर्धकासाठी) | १,०००/- | १,०००/- | ७००/- |

सर्व यशस्वी स्पर्धकास प्रशस्तीपत्रक व झपके कुटुंबियांकडून
कै. गुरूवर्य बापूसाहेब झपके स्मृतिचिन्ह

## ❋ स्पर्धेचे नियम ❋

१) जिल्हास्तरीय इ. ८ वी ते १० वी गट व इ. ११ वी, १२ वी गट वक्तृत्व स्पर्धा सोमवार दि. ०९.०९.२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. सुरू होतील.

२) तालुकास्तरीय इ. ५ वी ते ७ वी गट वक्तृत्व स्पर्धा मंगळवार दि. १०.०९.२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. सुरू होतील.

३) स्पर्धकास वर नमूद केलेल्या कोणत्याही एका विषयावर ठरवून दिलेल्या वेळेत बोलता येईल.

४) जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी प्रत्येक शाळेतून व ज्युनि. कॉलेजमधून दोन स्पर्धकास भाग घेता येईल.

५) वक्तृत्व स्पर्धेतील परगावच्या स्पर्धकांना स्पर्धेच्या दिवशीचा एकेरी प्रवास खर्च दिला जाईल.

६) स्पर्धकांची नावे खाली दिलेल्या गुगल फॉर्मव्दारे भरून दि. ०६.०९.२०२४ पर्यंत पाठवावीत. अधिक माहितीसाठी इ. ५ वी ते ७ वी गटासाठी श्री. मिलिंद फाळके ९०४९०६०६९०, इ. ८ वी ते १० वी गटासाठी श्री. उन्मेश आटपाडीकर- ८२७५४४८७०९ आणि इ. ११ वी, १२ वी गटासाठी प्रा. धनाजी चव्हाण- ८२७५०२५१५१ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.

७) स्पर्धेचे कामकाज पारदर्शक व बाह्य परीक्षकांमार्फत पार पाडले जाईल.

८) स्पर्धा समितीकडे स्पर्धा नियोजनाचे सर्व अधिकार राखून ठेवण्यात आलेले आहेत.

९) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

१०) वरील स्पर्धा सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनि. कॉलेज सांगोला येथे घेतल्या जातील.

११) जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या सर्व स्पर्धकास सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.

१२) प्रवेशिका गुगल फॉर्म, फोनवरून व वॉटस् ॲपव्दारे स्विकारल्या जातील. मात्र स्पर्धेच्या दिवशी मूळ प्रवेशिका प्रिंट काढून भरून आणणे आवश्यक आहे.

१३) प्रवेश अर्ज व स्पर्धेसंबंधीची माहिती पुस्तिका संस्थेच्या www.stspm.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

१४) सदर स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा स्पर्धा संपल्यानंतर लगेच त्याच ठिकाणी होईल.

तरी आपल्या प्रशालेतील, ज्युनि. कॉलेजमधील स्पर्धक सदर स्पर्धेसाठी पाठवून सहकार्य करावे ही सदिच्छा.

आपला विश्वासू

**श्री. अ.ल.गायकवाड**

प्राचार्य

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व

ज्युनि. कॉलेज, सांगोला

# प्रवेश अर्ज

## सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला

आयोजित

# कै. गुरूवर्य बापूसाहेब झपके स्मृती समारोह

**वक्तृत्व स्पर्धा-२०२४**

वक्तृत्व स्पर्धा दिनांक ०९/०९/२०२४ ते १०/०९/२०२४ पर्यंत

प्रति,
मा. प्राचार्य,
सांगोला विद्यामंदिर व ज्युनि. कॉलेज,
सांगोला

महाशय,
आपल्या शाळेकडील दिनांक ०६/०९/२०२४ रोजीच्या पत्रानुसार आपण आयोजित केलेल्या वरील स्पर्धेमध्ये सहभागी होणेसाठी या प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालय विद्यार्थ्यांची गटवार नांवे खालीलप्रमाणे पाठवित आहोत.

शाळेचे / ज्युनि. कॉलेजचे नांव ____________________

____________________

(वक्तृत्व स्पर्धा, तालुकास्तरीय)

| गट | स्पर्धकाचे नाव | विषय |
|---|---|---|
| ५ वी ते ७ वी | १) ____________<br>२) ____________ | १) ____________<br>२) ____________ |

(वक्तृत्व स्पर्धा, जिल्हास्तरीय)

| गट | स्पर्धकाचे नाव | विषय |
|---|---|---|
| ८ वी ते १० वी | १) ____________<br>२) ____________ | १) ____________<br>२) ____________ |

(वक्तृत्व स्पर्धा, जिल्हास्तरीय)

| गट | स्पर्धकाचे नाव | विषय |
|---|---|---|
| ११ वी ते १२ वी | १) ____________<br>२) ____________ | १) ____________<br>२) ____________ |

मुख्याध्यापक/प्राचार्य
शाळेचे/ज्युनि.कॉलेजचे नाव : ____________________

सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला

# कै. गुरूवर्य बापूसाहेब झपके स्मृती समारोह

पत्र व्यवहाराचा पत्ता :
मा. मुख्याध्यापक, सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेज,
सांगोला - ४१३३०७ (सोलापूर)
Website : www.stspm.org

## गुणवंत शिक्षक पुरस्कार-२०२४

प्रति,
मा. मुख्याध्यापक / प्राचार्यसो.,

____________________________________________

____________________________________________

विषय : कै. गुरूवर्य बापूसाहेब झपके स्मृती जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा व गुणवंत शिक्षक पुरस्कार २०२४

महोदय,
सस्नेह नमस्कार

दरवर्षी प्रमाणेच सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोलाचे संस्थापक अध्यक्ष, थोर देशभक्त व शिक्षण महर्षी कै. गुरूवर्य चं.वि.तथा बापूसाहेब झपके यांचा ४३ वा स्मृतीदिन समारोह दि. १६ सप्टेंबर २०२४ रोजी विविध कार्यक्रमांनी संपन्न होत आहे. त्याचाच एक भाग म्हणून जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले जाते. यावर्षीच्या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेसंबंधीची नियमावली, विषय सोबत जोडले आहेत.

तसेच **कै. गुरूवर्य बापूसाहेब झपके गुणवंत शिक्षक पुरस्कार** (जिल्हास्तरीय-माध्यमिक/ उच्च माध्यमिक) याबाबतची नियमावली व प्रवेशिका सोबत जोडली आहे. या पुरस्काराचे स्वरूप शाल, श्रीफळ, सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह, रोख रक्कम रूपये ११,०००/- असे राहील.

शिवाय दोन्ही स्पर्धेचे नियम व प्रवेशिका संस्थेच्या www.stspm.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

कृपया आपल्या शाळा/महाविद्यालयातून स्पर्धकांना प्रवृत्त करून सदर स्पर्धेमध्ये आपल्या शाळेचा/ महाविद्यालयाचा सहभाग नोंदवावा ही नम्र विनंती.

सहकार्याच्या अपेक्षेत...

सोबत : १) वक्तृत्व स्पर्धा नियमावली व प्रवेशिका
२) गुणवंत शिक्षक प्रवेशिका

**प्रा. प्र. चं. झपके**
अध्यक्ष,
सां.ता.शि.प्र.मं., सांगोला

सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला

# कै. गुरूवर्य बापूसाहेब झपके स्मृती समारोह

पत्र व्यवहाराचा पत्ता :
मा. मुख्याध्यापक, सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेज,
सांगोला - ४१३३०७ (सोलापूर)
Website : www.stspm.org

## गुणवंत शिक्षक पुरस्कार-२०२४

१) संपूर्ण नाव : ____________________

२) संपूर्ण पत्ता : ____________________

३) शाळेचे नाव व पत्ता : ____________________

____________________

४) भ्रमणध्वनी :                ५) कार्यालयीन फोन नंबर :

६) शैक्षणिक पात्रता :            ७) जन्मतारीख :

८) एकूण सेवा मुख्याध्यापकांच्या प्रमाणपत्रासह :

**खालील १ ते १३ मुद्यांची माहिती योग्य व मुद्देसुद शब्दात स्वतंत्र कागदावर द्यावी.**

१) विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकास व सुसंस्कार होण्यासाठी केलेले उपक्रम
   ✼ शैक्षणिक ✼ कला ✼ क्रीडा ✼ सांस्कृतिक ✼ वाचन ✼ आर्थिक
२) शाळा/उपमहाविद्यालयाच्या गुणवत्ता वाढीसाठी आपले योगदान.
३) तुमच्यामुळे तुमच्या शाळा/उपमहाविद्यालयाचे जिल्ह्यातील योगदान
४) आपण शिकवत असलेले विषय व त्याचा निकाल.
५) शाळेत कार्यरत असताना विभाग प्रमुख म्हणून घेतलेल्या जबाबदाऱ्या व त्याचे उल्लेखनीय वेगळेपण.
६) आपणास आवडणारी पुस्तके, लेखक व त्यांचे विचार.
७) आपले आजपर्यंतचे लिखाण अथवा प्रकाशित झालेले साहित्य. (रचनात्मक, प्रासंगिक)
८) आपणांस आजपर्यंत मिळालेले पुरस्कार व पुरस्कार प्रदान करणाऱ्या संस्था.
९) सामाजिक बांधिलकी म्हणून आपले समाजात कार्यरत असलेले उपक्रम
१०) आपण कार्यरत असलेल्या सामाजिक संस्था व त्यामधील आपले कार्य.
११) सध्याच्या शैक्षणिक परिस्थितीवर आपले वैयक्तिक विचार व शैक्षणिक क्षेत्रातील आपला नाविन्यपूर्ण उपक्रम.
१२) वैयक्तिक गुन्हा नोंद नसलेले मुख्याध्यापकांचे शिफारस पत्र.
१३) कोविड १९ काळात विद्यार्थी हितासाठी व समाजहिसाठी केलेले कार्य

वरील शिक्षकाची सर्व माहिती अचूक असून याबाबत मी आपणाकडे योग्य त्या सन्मानासाठी शिफारस करीत आहे.

**शिक्षकाचे नाव व सही**

**मुख्याध्यापक/प्राचार्य/संस्था अध्यक्ष सही व शिक्का**

विशेष सूचना : १) फॉर्म स्वहस्ताक्षरात लिहावा. २) आपण दिलेल्या माहितीच्या संदर्भात आवश्यक त्याच्या झेरॉक्स प्रती जोडाव्यात. ३) आपला प्रस्ताव ए-४ साईजच्या १० ते १२ पानाचा असावा. (झेरॉक्स सोडून) ४) पुरस्कारासाठी कोणाचीही शिफारस आणू नये. ५) अर्जदार स्वत: मुख्याध्यापक असतील तर त्या प्रस्तावावर संस्था अध्यक्षांची स्वाक्षरी असावी. ६) याबाबत आपणांस काही शंका असल्यास- श्री मिलींद फाळके सर-मो. ९०४९०६०६९० यांच्याशी संपर्क करावा. ७) प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक १०/०९/२०२४ असेल.